CNR No. MHPU120008532022

| | |
|---|---|
| दाखल दिनांक | : १२/०९/२०२२ |
| नोंदणी दिनांक | : १२/०९/२०२२ |
| निकाल दिनांक | : ०७/०३/२०२६ |
| कालावधी | : वर्ष महिने दिवस<br>०३ ०५ २५ |

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोर यांचे समक्ष**

**(पीठासीन अधिकारी – श्रीमती मीना वामन जाधव)**

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.१५९/२०२२**

**निशाणी क्र. १९**

०१. सौ. शुभांगी सतीश बागडे
वय – ३२ वर्षे, धंदा – घरकाम

०२. कु. शार्वी सतीश बागडे
वय – ०५ वर्षे, धंदा – शिक्षण
दोघे रा. – केअर ऑफ महादेव धोंडिबा
कांबळे, हिराधन बाग सोसायटी,
शिवापुर आळी, फ्लॅट क्र. ११, भोर,
ता. भोर, जि. पुणे **.....अर्जदार.**

**विरुध्द**

०१. सतीश सर्जेराव बागडे
वय – सज्ञान, धंदा – नोकरी

०२. सर्जेराव नाथा बागडे
वय – सज्ञान, धंदा – शेती

०३. सौ. शारदा सर्जेराव बागडे
वय – सज्ञान, धंदा – घरकाम
१ ते ३ रा.– ए विंग, फेज २ बिल्डींग नं. ३,
रुम नं. ४०७, श्री लक्ष्मी पार्क लोकमान्यनगर,
पाडा नं. २ ठाणे (प)

०४. सौ. स्वाती योगेंद्र राव
वय – सज्ञान, धंदा – घरकाम
रा. ई १९०२, वृष्टी दोस्ती विहार,
वर्तुळनगर,ठाणे

०५. सौ. श्वेता संजय शिंदे
वय – सज्ञान, धंदा – नोकरी,
रा.१००१/२बी, यश इन्व्लेव्ह सुभाष रोड,
कुंभकर्ण पाडा, डोंबिवली, कल्याण. **.......जाबदेणार.**

---

**अर्ज – कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम १२,१८,१९,२०,२१ व २२ अन्वये अर्ज.**

---

---

**अर्जदाराकरीता वकील – विधिज्ञ श्रीमती अश्विनी टोले**

**जाबदेणार क्र. १ ते ४ करीता एकतर्फा**

**जाबदेणार क्र. ५ तर्फे विधिज्ञ श्री. एस.बी. पिंगळे वकील**

---

## न्यायनिर्णय

## (दि.०७/०३/२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने स्वतःकरीता जाबदेणार यांच्या विरुध्द कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२,१८,१९,२०,२१ व २२ अन्वये दाखल केलेला आहे.

२. **अर्जाची पार्श्वभुमी थोडक्यात खालीलप्रमाणे –**

अर्जदार यांनी जाबदेणार यांच्याविरुद्ध राहण्यासाठी घर, पोटगी, संरक्षण, ताबा व नुकसान भरपाई मिळण्यासाठी सदर अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व जाबदेणार क्र. १ यांचा विवाह दिनांक ११/०२/२०१६ रोजी हिंदू विधीप्रमाणे झाला असून त्या सहजीवनातून शार्वी नामक मुलगी जन्माला आलेली आहे व ती सध्या अर्जदार यांच्याकडे राहते. अर्जदार यांचे म्हणणे असे आहे की,

विवाहापूर्वी जाबदेणार क्र. २ यांनी जाबदेणार क्र. १ यांच्याबाबत चुकीची माहिती देऊन विश्वास संपादन केला. विवाहानंतर अल्पावधीतच जाबदेणार यांनी अर्जदार यांना मारहाण, शिवीगाळ व मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. सासू–सासरे यांच्याकडूनही अपमानास्पद वर्तन, टोमणे, शिवीगाळ व मारहाण होत असल्याचे अर्जदार यांनी नमूद केले आहे. अर्जदार यांच्या इच्छेविरुद्ध लैंगिक संबंध ठेवणे, आर्थिक बाबींमध्ये अपमानास्पद मागण्या करणे, कपडे व वैयक्तिक वस्तूंसाठी पैसे न देणे, तसेच सासऱ्यांकडून अयोग्य वर्तन झाल्याचेही अर्जदार यांनी नमूद केले आहे. गर्भावस्थेत देखील अर्जदार यांना मारहाण व जड कामे करायला लावली जात असल्याचे सांगितले आहे. मुलगी जन्माला आल्यानंतर तिच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले व मुलगा हवा असल्याचे बोलले जात असल्याचे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

३. अर्जदाराच्या पुढील कथनानुसार जाबदेणार यांनी अर्जदार यांच्या आई–वडिलांचा अपमान करून सोन्याची चैन व कपड्यांची मागणी केली असल्याचे नमूद केले आहे. अर्जदार यांना योग्य अन्न न देणे, आजारी असताना उपचारासाठी न नेणे, धमक्या देणे, नोकरी करू न देणे व दागिने ताब्यात ठेवणे असे प्रकार झाल्याचे अर्जदार यांनी नमूद केले आहे. अर्जदार माहेरी राहात असताना मध्यस्थीने परत पाठविण्यात आले परंतु पुन्हा त्रास सुरू झाला व मुलीच्या जीवाची भीती दाखवून स्टॅम्प पेपरवर सही घेतल्याचेही अर्जदार यांनी नमूद केले आहे. पुढे कोरोनाच्या काळात त्रास वाढल्यामुळे आत्महत्येचा विचार मनात आला होता असे अर्जदार यांनी म्हटले आहे. दिनांक ०६/११/२०२१ रोजी अर्जदार माहेरी आल्यापासून जाबदेणार यांनी त्यांना परत नांदावयास नेले नाही व त्यानंतर अर्जदार मुलीसह माहेरी राहात आहेत. जाबदेणार यांनी पती व वडील म्हणून जबाबदारी पार पाडलेली नाही असे अर्जदार यांचे म्हणणे आहे. जाबदेणार क्र. १ हे नोकरी करून दरमहा सुमारे रु.४५,०००/– उत्पन्न मिळवत असल्यामुळे अर्जदार व मुलगी यांना दरमहा रु.३५,०००/– पोटगी व रु.५,०००/– घरभाडे देण्याचा आदेश द्यावा तसेच

वैद्यकीय खर्चासाठी रु.३५,०००/– रक्कम त्वरित देण्याचा आदेश द्यावा यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

४. जाबदेणार क्र. १ ते ४ हे सदर प्रकरणात नोटीस बजावणी करुनही हजर झाले नाही. करीता त्यांचेविरुध्द नि.क्र. १ वर आदेश पारित करुन प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले. सदर प्रकरणाची लेखी सुचना प्राप्त झाल्यानंतर जाबदेणार क्र. ५ सदर प्रकरणात हजर झाले. परंतु त्यांनी त्यांचा लेखी जबाब सादर केला नाही. सबब, प्रकरण जाबदेणार यांचे लेखी जबाबाशिवाय चालविण्यात आले.

५. दोन्ही बाजुची हकीकत पाहता खालील मुद्दे माझे निर्धारणार्थ उद्भवले असून, त्यावरील माझे निष्कर्ष व कारणमिमांसा पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | जाब देणार यांनी अर्जदारचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार हिने सिध्द केलेले आहे काय ? | – | होकारार्थी. |
| २. | अर्जदार जाबदेणार यांच्याकडून दरहमा पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | – | होकारार्थी. दरमहा र.रु. १०,०००/– |
| ३. | अर्जदार जाबदेणार यांच्याकडून निवासी व्यवस्था आदेश किंवा घरभाडे मिळणेस पात्र आहे काय ? | – | होकारार्थी. दरमहा र.रु. ३,०००/– |
| ४. | अर्जदार ही जाबदेणार यांच्याकडून कौटूंबिक हिंसाचारामुळे झालेल्या शारिरीक व मानसिक त्रासाकरीता नुकसान भरपाई | – | होकारार्थी. रु. ५,००,०००/– |

| | | | |
|---|---|---|---|
| | आदेश मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | | |
| ५. | अर्जदार हे संरक्षण आदेश मिळणेस पात्र आहेत काय ? | – | नकारार्थी. |
| ६. | आदेश काय ? | – | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

६. अर्जदार हिने आपल्या अर्जाच्या पृश्टयर्थ निशाणी क्र.१५ प्रमाणे तिचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. संरक्षण अधिकारी यांचेतर्फे कौटुंबिक घटना पत्रा सह अहवालाची प्रत नि.क्र. ४/१ व ४/२ येथे, तसेच अर्जदारांतर्फे अर्जदार व जाबदेणार यांच्या लग्न पत्रीकेची मुळ प्रत नि.क्र. ४/३ येथे, लग्नाचा फोटो नि.क्र. ४/४ येथे, तसेच जाबदेणार क्र. १ ते ३ यांना बजावणी झाल्याची ट्रॅक रिपोर्टच्या प्रती नि.क्र. १३/१ ते १३/३ येथे दाखल केली आहेत. तसेच अर्जदार यांनी नि.क्र. १६ कडे पुरशिस दाखल करुन पुरावा बंद केला आहे.

**प्रश्न क्र. १ करिता –**

७. अर्जदाराने तिचा पुरावा सरतपासाच्या शपथपत्राद्वारे सादर केला आहे. शपथपत्रामध्ये तिने अर्जामध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींचा उल्लेख केलेला आहे. तिने शपथपत्राद्वारे तिचा आणि जाब देणार क्र.१ यांचा विवाह दि.११/०२/२०१६ रोजी झाल्याचे व सदर लग्नापासून त्यांना मुलगी शार्वी हिचा जन्म झाला असल्याचे कथन केले आहे. तसेच लग्नानंतर जाब देणार क्र. १ याने तिला मारहाण केली. तसेच जाबदेणार यांनी तिला टोचून बोलून गलिच्छ भाषेत शिवीगाळ करून उलथानाने हातावर गरम चटके देऊन त्रास दिला. तसेच जाबदेणार क्र १ याने अर्जदार हिची इच्छा नसताना लैंगिक संबंध केले. तसेच अर्जदार हिस मुलगी झाली या कारणावरून त्यांनी टोचून बोलून दोघींकडे लक्ष दिले नाही. जाबदेणार क्र २ यांनी देखील तिला साडी बदलत असताना लपून बघणे, टॉयलेट बाथरूम ला गेली

असता दार ढकलणे अशा प्रकारचा त्रास दिला. त्यानंतर अर्जदार ही दिवाळी सणा निमित्त दि.०६/११/२०२१ रोजी माहेरी गेली. त्यानंतर जाब देणार यांनी अर्जदार हिला नांदवयास नेलेले नाही.

८. वर नमूद पुराव्यास जाबदेणार तर्फे अव्हान देण्यात आले नाही. अर्जदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसते की, तिने जाबदेणार यांचे विरुध्द कौटूंबिक हिंसाचाराबाबत स्पष्ट पुरावा दिला आहे. त्यामुळे जाबदेणार यांनी तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला ही बाब मी मान्य करते. त्याप्रमाणे मी प्रश्न क्र. १ चे उत्तर जाबदेणार विरुध्द होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र. २ करिता</u> –**

०९. अर्जदाराच्या शपथपत्रातील पुराव्यात असे आले आहे की, तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायद्यानुसार अर्जदाराकडे प्रत्यक्ष उत्पन्नाचे साधन आहे ही बाब जाबदेणार याने न्यायालयापुढे सिध्द करणे आवश्यक आहे. सदर बाब न्यायालयापुढे सिध्द झालेली नाही. अशा परिस्थितीत अर्जदाराच्या पुराव्यावर विश्वास ठेवुन मी या निष्कर्षावर येत आहे की, अर्जदाराला स्वतःचे पालन पोषण करणेकरीता उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

१०. अर्जदार हिने तिच्या शपथपत्रामध्ये नमुद केले आहे की, ती तिच्या मुलीसह माहेरी राहत आहे. तसेच यापुर्वी नांदत असताना आणि त्यानंतरही जाबदेणार क्र. १ याने एक पती आणि वडील म्हणुन कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. तसेच तिने नमुद केले आहे की, जाबदेणार क्र. १ हा पुर्वी रिलायन्स रिटेल लि. मध्ये नोकरी करत होता. त्यानंतर तेथील नोकरी सोडुन तो आता टाटा मोटर्स मध्ये नोकरी करत असुन त्याला दरमहा ४५,०००/– रुपये पगार मिळत आहे. अर्जदार हिने नि.क्र. १४ कडील यादी लगत रिलायन्स रिटेल येथील जाबदेणार क्र. १ याने नोकरी सोडल्याचे तसेच टाटा मोटर्स येथे दिनांक

०६/०४/२०२१ रोजीचे नोकरीचे ऑफर लेटर दाखल केले आहे. परंतु सदर पत्रावरुन जाबदेणार क्र. १ यास दरमहा ४५,०००/– रुपये पगार असल्याचे दिसुन येत नाही. परंतु जाबदेणार क्र. १ हा कंपनीत नोकरी करत असल्याचे दिसुन येते. त्यासंबंधाने जाबदेणार क्र. १ याने कोणताही पुरावा दिलेला नाही अथवा अर्जदार हीच्या कथनाचे खंडन केलेले नाही.

११. अर्जाच्या अवलोकनावरुन अर्जदार ही मध्यम कुटूंबाची सदस्य आहे. असे दिसते. अर्जदाराच्या राहणीमानावरुन व तिच्या आणि तिच्या मुलीच्या दैनंदिन गरजा लक्षात घेवुन मी या निष्कर्षाला येत आहे की, अर्जदारास दरमहा र.रु. १०,०००/– एवढी रक्कम तिच्या दैनंदिन गरजा भागवण्याकरीता पुरेसी होईल. म्हणुन मी प्रश्न क्र. २ चे उत्तर त्याप्रमाणे होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र. ३ करिता</u> –**

१२. अर्जदार हिने तिच्या पुराव्याच्या शपथपत्रामध्ये दरमहा घरभाडे र. रु. ५,०००/– देण्याची मागणी केली आहे. तिने शपथपत्रामध्ये नमुद केले आहे की, ती दि.०६/११/२०२१ पासुन तिच्या माहेरी भोर येथे राहत आहे. तसेच जाबदेणार क्र. १ याने अर्जदार व तिच्या मुलीची कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. त्यामुळे जाबदेणार क्र. १ याने अर्जदार हिस घरभाडे म्हणुन दरमहा रुपये ३,०००/– देणे योग्य होईल असे मला वाटते. सबब, मी प्रश्न क्र. ३ चे उत्तर त्याप्रमाणे होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>प्रश्न क्र. ४ करिता</u> –**

१३. अर्जदाराने जाबदेणार कडुन कौटुंबिक हिंसाचार पासुन महिलांचे संरक्षण कायदा अंतर्गत रुपये ६०,००,०००/– नुकसान भरपाई मिळण्याची मागणी केली आहे. प्रश्न क्र. १ चे उत्तर देताना जाबदेणार यांनी अर्जदाराविरुध्द कौटुंबिक

हिंसाचार केला ही बाब मी मान्य केली आहे. त्यामुळे सदर हिंसाचार अनुषंगे अर्जदार ही नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराच्या आर्थिक परिस्थितीचे तसेच कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरुप लक्षात घेता अर्जदार ही जाबदेणार क्र. १ याचेकडुन रुपये ५,००,०००/– नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे असा मी निष्कर्ष नोंदवित अहे. त्याप्रमाणे मी प्रश्न क्र. ४ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>प्रश्न क्र. ५ करिता</u> –**

१४. जाबदेणार विरुध्द अर्जदाराने संरक्षण आदेशाची मागणी केली आहे. सध्या अर्जदार ही तिच्या मुलीसह तिच्या माहेरी मौजे भोर ता. भोर येथे राहत आहे. अशा परिस्थितीत जाबदेणार हे अर्जदार हिला मौजे भोर येथे येवुन कौटुंबिक हिंसाचार करीत आहे. याबाबतचा न्यायालयापुढे अर्जदारतर्फे पुरावा देण्यात आला नाही. त्यामुळे अर्जदार ही जाबदेणार विरुध्द संरक्षण आदेश मिळण्यास पात्र नाही असा मी निष्कर्ष नोंदवुन त्याप्रमाणे प्रश्न क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>प्रश्न क्र. ६ करिता</u> –**

१५. प्रश्न क्र. १ ते ४ ची उत्तरे होकारार्थी दिल्याने अर्जदार ही पोटगी दरमहा रुपये १०,०००/– तसेच घरभाडे दरमहा रुपये ३,०००/– तसेच नुकसान भरपाई म्हणुन रुपये ५,००,०००/– जाबदेणार क्र. १ याचेकडुन मिळण्यास पात्र आहे. तसेच प्रश्न क्र. ५ चे उत्तर नकारार्थी दिल्याने अर्जदार संरक्षण आदेश मिळणेस पात्र नाही. याप्रमाणे प्रश्न क्र. ६ च्या उत्तरादाचखल मी खालील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.
२. जाबदेणार क्र.१ याने अर्जदार क्र. १ व २ यांना दरमहा रक्कम रुपये १०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये दहा हजार फक्त) आणि अर्जदार क्र. २

खर्च दाखल तारखेपासुन म्हणजेच दि. ०८/०९/२०२२ रोजीपासुन पोटगी म्हणुन द्यावी.

३. जाबदेणार क्र. १ याने अर्जदारांना घरभाडे म्हणुन दरमहा रक्कम रुपये ३,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार फक्त) अर्ज दाखल तारखेपासुन म्हणजेच दि. ०८/०९/२०२२ रोजीपासुन द्यावी.

४. जाबदेणार क्र. १ याने अर्जदारांस रक्कम रुपये ५,००,०००/-(अक्षरी रुपये पाच लाख फक्त) नुकसान भरपाई म्हणुन द्यावेत.

५. निकालाची प्रत विनामुल्य अर्जदार, जाबदेणार, संरक्षण अधिकारी व संबंधित पोलिस ठाण्यास अंमलबजावणीकरीता देण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JADHAV MEENA WAMAN
Date: 2026.03.10 17:56:23 +0530

**ठिकाण : भोर** **( मीना वा. जाधव )**

**दिनांक : ०७.०३.२०२६.** **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, भोर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर मुळ आदेशाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | एम.एस. कोंढरे, नि.श्रे. |
| न्यायालयाचे नाव | – | मे. श्रीमती एम.व्ही. जाधव, प्र.वर्ग. न्या.दं. भोर |
| निकाल तारीख | – | ०७.०३.२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी सही केल्याची तारीख | – | ०७.०३.२०२६ |
| अपलोड केल्याची तारीख | – | १०.०३.२०२६ |